पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• वर्ष २ रे • अंक : २० •मे २००९ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती – www.punecorporation.org

## मा. महेश झगडे, महापालिका आयुक्त यांचा संदेश



पुणे महापालिकेच्या कामगार विश्वातील घडामोडींची माहिती आधुनिक तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर अधिकारी/सेवकांना उपलब्ध करुन देणे, प्रशासन आणि अधिकारी/सेवकांमधील सुसंवादासाठी कल्याणवार्ता हे एक प्रभावी माध्यम आहे. कल्याणवार्ता मासिक दरमहा महापालिकेत कामगारांचे मुखपत्र म्हणून प्रसिध्द केले जाते हे ऐकून मनस्वी आनंद झाला. या मुखपत्रामध्ये महापालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांमार्फत राबविण्यात येणारे विविध प्रकल्प उपक्रम, कामगार विश्वातील घडामोडी, मनुष्यबळ विकासाच्या दृष्टीने आवश्यक असलेली माहिती अधिक परिणामकारक रितीने सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांपर्यंत पोचविण्याची महत्वाची जबाबदारी कल्याणवार्ता या मासिकावर आहे, असे मला वाटते. त्याचप्रमाणे बदलती कार्यालयीन पध्दती विचारात घेवून अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या कार्यपध्दतीत आणि पर्यायाने त्यांच्या कार्यक्षमतेत बदल घडवून आणण्याचे महत्वाचे उद्दिष्ट कल्याणवार्ता मासिकाचे असावे.

महापालिकेच्या विविध विकास प्रकल्प, देखभाल दुरुस्ती, उत्पन्नाचे मार्ग, कामगार कल्याण योजना आणि तदनुषंगिक कामामध्ये योग्य तो समन्वय असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे महापालिकेच्या विकास कामांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढविण्याची गरज आहे. सोपविण्यात आलेल्या योजनांची आणि कामकाजाची अधिक गतीने, कार्यक्षमतेने आणि परिणामकारक अंमलबजावणी होणे अतिशय आवश्यक आहे. किंबहुना प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे हेच उद्दिष्ट आणि कार्य असले पाहिजे. या दृष्टीने विविध अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सकारात्मक सूचना, त्यांना आधुनिक पध्दतीच्या कामकाजाचे मार्गदर्शन, कर्मचाऱ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणेकामी विविध उपाय योजना, इत्यादींची दखल कल्याणवार्ता मासिकामार्फत घेतली जाईल आणि भविष्यकाळात कल्याणवार्ता हे मासिक सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरेल अशी मला आशा आहे. कल्याणवार्ता मासिकास माझ्या हार्दिक शुभेच्छा.

## क्षेत्रीय कार्यालय कामकाज पध्दती गतिमानता कार्यशाळेचे आयोजन

शनिवार दि.९/५/०९ रोजी सकाळी ८.३० ते दुपारी ४.३० या कालावधीत उपायुक्त, विभागीय कार्यालय क्र.२ येथे क्षेत्रीय कार्यालय



कामकाज पध्दती गतिमानता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन सकाळी ९ वाजता मा.मच्छिंद्रनाथ देवणीकर, अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांचे शुभ हस्ते झाले. कार्यशाळेत ढोलेपाटील रोड, येरवडा व संगमवाडी क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी सहभागी झाले होते.

सदर कार्यशाळेमध्ये पुणे मनपातील विविध उपक्रम, कामकाज नियोजन, कार्यपध्दती, अधिकार क्षेत्र, बहुविध समन्वय व कामातील गतिमानता वृध्दिंगत होण्यासाठी व्याख्याने व संगणकीय सादरीकरणाद्वारे विविध विषयांची सखोल माहिती देवून मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यशाळेमध्ये पुणे मनपातील अधिकाऱ्यांनी पुढील विषयांवर मार्गदर्शन केले. मा. सुरेश जगताप, उप आयुक्त क्र. ३ – पुणे शहराचे घन कचरा व्यवस्थापन, मा. श्रीनिवास बोनाला, अतिरिक्त नगर अभियंता (ट्रॅफिक) – पुणे शहराचे वाहतूक व्यवस्था व आयआरसी नुसार रस्त्यांची घ्यावयाची काळजी, मा. विवेक खरवडकर, अतिरिक्त नगर अभियंता (पथ) – रस्ते बांधणी व पुनर्डांबरीकरण करताना घ्यावयाची दक्षता, मा.प्रविण अष्टीकर, उप आयुक्त (गवनि) – पुणे शहरामध्ये जेएनएनयुआरएम अंतर्गत होत असलेले प्रकल्प, मा. व्ही.आर.पाटील, विशेष कार्याधिकारी (प्रकल्प) – बीएसयुपी अंतर्गत झोपडपट्टी सुधार व पुनर्वसन प्रकल्प, मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) – कामगार कल्याण व कामगार कायदे, मा. डॉ. रेखा गलांडे, क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी – शहराच्या आरोग्यासाठी स्थापत्य शाखेचे योगदान, मा. उल्का कळसकर, मुख्य लेखापाल व मा. सौ सविता नलावडे, उप मुख्य लेखापाल – अंदाजपत्रकीय कामाबाबत घ्यावयाची काळजी, मा. मुकुंद भोसले, क्षेत्रीय अधिकारी – भांडवली कामे गुणवत्तापूर्वक कशी करता येतील, मा. शाम ढवळे, नगर उप अभियंता – पुणे शहराचा झपाट्याने बदलत असलेला चेहरा.

या प्रसंगी श्री. विजय दहिभाते, उप आयुक्त, श्री. माधव जगताप, श्री. अनिल जगताप, श्री. नितीन उदास, श्री. वसंत पाटील, क्षेत्रीय अधिकारी, श्री. गणपत साळुंके, श्री डी.एल.फराटे, तसेच अन्य मनपा कर्मचारी/अधिकारी उपस्थित होते. सदर कार्यशाळेचा समारोप मा. श्री. उमाकांत दांगट, अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) व मा. ज्ञानेश्वर मोळक, उप आयुक्त (वि.का.क्र. २) यांच्या मार्गदर्शनाने झाला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती संगिता देसरडा यांनी केले. कार्यशाळेची अभिनव कल्पना व आयोजनामध्ये मा.मोळक यांनी स्वयंस्फूर्तीने कार्यवाही करुन प्रशासनास उपयुक्त उपक्रम यशस्वीपणे अमलात आणला. त्याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन. याचा आदर्श अन्य खातेप्रमुखांनी घेवून सातत्याने असे उपक्रम सुरु रहावेत, हीच अपेक्षा.

## ढोले पाटील रोड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत जनजागृती मोहिम

कै. बा.स.ढोले पाटील रोड क्षेत्रीय कार्यालयाकडील प्रभाग क्रमांक ४१ मुंढवा गाव येथे संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानांतर्गत स्वच्छता व जनजागृती मोहिम राबविण्यात आली. त्या निमित्त प्रभागांतर्गत प्रभाग फेरी काढण्यात आली. पथकाच्या कलाकारांनीही प्रभाग फेरीत सहभाग घेवून जागोजागी नागरिकांना ओला व सुका कचऱ्याबाबत प्रबोधन व्हावे म्हणून पथनाट्य सादर केले. स्वच्छतेवर आधारित विविध गाणी गावून वॉर्डातील नागरिकांना स्वच्छतेबाबत



सदर प्रभाग फेरीत वॉर्ड क्र. ४१ मधील आरोग्य कोठीवरील सर्व सफाई सेवकांनी वॉर्डातील अंतर्गत रस्ते, गल्ली बोळ, सार्वजनिक ठिकाणी नागरिकांनी कचरा टाकून अस्वच्छ केलेले प्लॉट्स यांची साफसफाई करुन प्रभागातील सर्व परिसराची स्वच्छता करण्यात आली. ही प्रभाग फेरी मुंढवा गाव, गायकवाड आळी, कामगार मैदान चौक, सरोदय कॉलनी खराडी हडपसर रोड, किर्तने बाग, धायरकर वस्ती, ताडीगुत्ता चौक, इत्यादी ठिकाणी करण्यात आली. आरोग्य कोठीवरील सफाई सेवकांनी सार्वजनिक स्वच्छता, ओला सुका कचरा वर्गिकरण, इत्यादीबाबत जनजागृती करण्यासाठी वॉर्डातील नागरिकांच्या घरी जावून पत्रके वाटली. ओला कचरा व सुका कचरा वेगळा द्यावा, स्वच्छ पुणे सुंदर पुणे, स्वच्छतेमध्ये नागरिकांचा सहभाग, इत्यादी घोषणा देत व हातात स्वच्छतेविषयी फलक घेवून मोठ्या उत्साहात प्रभाग फेरीमध्ये नागरिकही सहभागी झाले होते.

नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती व्हावी या उद्देशाने पुणे महानगरपालिका कामगारांचे जनजागृती कला संदेश देवून महानगरपालिकेची कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची सध्याची परिस्थिती व भविष्यात कचऱ्यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी याबाबत दक्ष राहण्याची व नागरिकांचे हक्क व कर्तव्य याची जाणीव करुन दिली. तसेच, ओला व सुका कचरा वेगवेगळा करुन देण्याचे व आपला परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन करण्यात आले.

सदर प्रभाग फेरीमध्ये कै. बा.स.ढोलेपाटील रोड क्षेत्रीय कार्यालयाचे प्रभारी क्षेत्रीय अधिकारी मा. श्री. रविंद्र कांबळे, क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी डॉ. मिलिंद खेडकर, विभागीय आरोग्य निरीक्षक श्री. दिलीप जाधव, आरोग्य निरीक्षक श्री. साबळे तुळशीराम, श्री. राजेंद्र बहिरट, श्री. दत्तात्रय क्षीरसागर, श्रीमती निलीमा काकडे, श्रीमती रोजमेरी काकडे व पुणे महानगरपालिका कामगार युनियनचे कार्याध्यक्ष श्री. प्रकाश जाधव यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन आरोग्य निरीक्षक श्री. साबळे तुळशीराम व त्यांच्या सहकाऱ्यांनी यशस्वीरित्या केले.

## वाचक प्रतिसाद

आपले कल्याणवार्ताचे काही अंक वाचण्यात आले. अंक चांगले काढलेले आहेत. अंकातून प्रसिध्द होणाऱ्या मुलाखतींमधून मनपा सेवेतील विविध कर्मचाऱ्यांचा परिचय वाचनीय असतो. आपल्याला माहित नसलेल्या पण विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची यातून ओळख होते. संपादकीय वाचनीय असून, विचार करायला लावणारे आहे.

मनपा कामगारांसाठी होणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती यातून दिली जाते. कामगारांच्या प्रश्नावर विविध लिखान अंकातून प्रसिध्द व्हावे, असे वाटते. कर्मचाऱ्यांच्या साहित्यालाही अंकातून प्रसिध्दी द्यावी. यामुळे अंक अधिक वाचनीय व्हायला मदत होईल.कल्याणवार्ताचा अंक पहाता कामगार वर्गासाठी विविध साहित्य, माहिती देणारे अंक फारच दुर्मिळ आहेत. आपण चालू केलेला अंक एक स्वागतार्ह उपक्रम असून त्यास माझ्या हार्दिक शुभेच्छा. हा अंक जास्तीत जास्त कर्मचाऱ्यांपर्यंत जावा, एवढीच अपेक्षा.

**श्री. सुभाष एम. बारी**
**भवन रचना कार्यालय**

## संपादकीय...

### कार्यमूल्यमापन व गोपनीय अहवाल

प्रत्येक संस्थेमध्ये कर्मचाऱ्याची कार्यक्षमता, विकास व त्यांच्यातील गुणदोषांची चाचणी करण्यासाठी कार्यमूल्यमापन एक अत्यंत महत्वाची निर्धारणा प्रक्रिया आहे. एखाद्या विशिष्ट कर्मचाऱ्याची केलेली निवड योग्य आहे का? सदर कर्मचारी बढतीठी पात्र आहे का? नियुक्तीपासून केलेल्या कामाची गुणवत्ता व इतर बाबींच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांची क्षमता व दर्जा ठरविण्यासाठी कार्यमूल्यमापन एक अत्यंत प्रभावी माध्यम आहे. विशेषत: परिविक्षाधीन कालावधीत नियमित व परिणामकारक कार्यमूल्यमापन उपयुक्त ठरते. थोडक्यात वर्तमानकालीन कार्य व क्षमता व भविष्यकालीन नियोजन व क्षमता याचे समन्वयाने मूल्यमापन करणे म्हणजे अचूक कार्यमूल्यमापन होय. तसेच, संबंधित कर्मचाऱ्याच्या गुणवत्तेचा दर्जा आजमावण्यासाठी ही पध्दत अतिशय उपयुक्त ठरते. गुणवत्ता प्रतवारी व कार्यमूल्यमापन या संज्ञांमध्ये फरक आहे. गुणवत्ता प्रतवारीमध्ये कर्मचाऱ्याची मानसिकता, शारिरीक क्षमता, इ.बाबत अंदाज व्यक्त केला जातो. तर कार्यमूल्यमापनामध्ये क्षमता, कौशल्य, इ.ची पहाणी केली जाते. कार्यमूल्यमापनामुळे संघटनेच्या व्यवस्थापकीय व प्रशासकीय पातळीवरील प्रश्न सोडविणेस मदत होते. प्रत्येक संघटनेमध्ये कार्यमूल्यमापनाची पध्दत व प्राधान्यक्रम भिन्न असल्याचे आढळून येते. तथापि, प्रत्येक संस्थेत एक मुलभूत सूत्र असते. ते म्हणजे संबंधित कर्मचाऱ्याची संस्थेप्रति असणारी आस्था, की मी संस्थेसाठी आहे, संस्था माझ्यासाठी नव्हे. संस्थेमुळे मला स्वतंत्र दर्जा प्राप्त झाला आहे. तो मला कायम ठेवून वृध्दिंगत करणे आहे. त्यासाठी पूर्ण व स्वच्छ निष्ठा व पूर्ण कार्यक्षमता संस्थेसाठी असणे हा मूलमंत्र वा मुलभूत सूत्र होय. त्यानुसार मूल्यमापन होणे अपरिहार्य ठरते. सेवकांच्या तत्पर कार्यामुळे वा तत्पर प्रतिसादामुळे संस्था व त्याबरोबर कर्मचारीही मोठे होतात.

मनुष्यबळाबाबतच्या निर्णयांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेसाठी कार्यमूल्यमापन अतिशय महत्वाचे साधन आहे. कर्मचाऱ्याची पदोन्नती, वेतनवाढ, बदली, इ.च्या अनुषंगाने योग्य व अचूक निर्णय या पध्दतीमुळे घेणे शक्य होते. या पध्दतीचा दुसरा महत्वाचा लाभ म्हणजे सेवकांच्या कामकाजावर परिणामकारक नियंत्रण ठेवता येते. प्रत्येक कर्मचाऱ्यावर गुणवत्ता वाढणेसाठी मानसिक दडपण असते. विविध घटकांच्या अनुषंगाने मूल्यमापन करण्यात येत असल्याने गुणवत्ता वाढीशिवाय पर्याय व पदोन्नती नाही, असा संदेश कर्मचाऱ्यांमध्ये जातो व त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या कामकाजात शिस्त येवून कार्यक्षमता वाढीस लागते. याशिवाय तिसरा अत्यंत महत्वाचा फायदा म्हणजे कर्मचाऱ्यांची सद्यस्थिती, त्याची क्षमता, त्याचे वर्तन या अनुषंगाने माहिती उपलब्ध होते. सदर माहिती संबंधित कर्मचाऱ्यास असते. त्यामुळे कर्मचाऱ्यामधील दोषांवर मात करणेसाठी कर्मचाऱ्यास योग्य प्रशिक्षण देवून त्याचा विकास करण्याची संधी त्यास मिळते. या पध्दतीमुळे कर्मचाऱ्यामध्ये गुणवत्ता वाढीबरोबर निकोप स्पर्धा वाढीस लागते. त्यामुळे प्रसंगी ज्येष्ठ वा सहकाऱ्यांचे अनुकरण होवून परस्पर सामंजस्य, समन्वय व सहकार्याची भावना वाढीस लागून सुदृढ संबंध निर्माण होवून सौहार्दाचे वातावरण निर्माण होते.

प्रचलित कार्यपध्दतीनुसार गोपनीय अहवालाद्वारे कर्मचाऱ्यांचे कार्यमूल्यमापन करण्याची पध्दत सर्वमान्य आहे. या पध्दतीद्वारे कर्मचाऱ्याचे सर्वसाधारण मूल्यमापन केले जाते. शासकीय व निमशासकीय संस्थेमध्ये कर्मचाऱ्यांना बढती देताना गोपनीय अहवालाद्वारे कर्मचाऱ्याची कार्यक्षमता, वर्तन व नियमितता या अनुषंगाने मूल्यमापन करुन निर्णय घेण्यात येतो. त्यामुळे प्रत्येक कर्मचाऱ्याचे गोपनीय अहवाल नोंदविणे व वेळोवेळी अद्ययावत करणे अनिवार्य झाले आहे. गोपनीय अहवाल नोंदविताना कर्मचाऱ्याने मागील आर्थिक वर्षामध्ये सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या व केलेली उत्कृष्ट कामगिरी स्वयंमूल्य निर्धारण अहवालाद्वारे भरणे आवश्यक आहे. तदनंतर कर्मचाऱ्यांवर दैनंदिन पर्यवेक्षण व नियंत्रण ठेवणाऱ्या अधिकाऱ्याने प्रतिवेदन अधिकारी म्हणून गोपनीय अहवालातील बाबी नोंदविणे आवश्यक आहे. पूर्वीच्या काळी प्रत्येक संस्थेमध्ये वेगवेगळ्या नमुन्यामध्ये गोपनीय अहवाल नोंदविले जात असत.तथापि, शासनाने यामध्ये एकसूत्रता येणेकामी नमुना विहित केला असून त्यामध्ये गोपनीय अहवाल ठेवले जातात. प्रतिवेदन अधिकाऱ्याने गोपनीय अहवाल नोंदविताना त्यामध्ये विहित केलेल्या बाबींबाबत स्पष्टता ठेवणे आवश्यक आहे. सदर कर्मचाऱ्याचे वर्तन, बुध्दिमत्ता, सहकाऱ्यांशी संबंध, सचोटी व चारित्र्य, प्रशिक्षण, इ.बाबी विचारात घेवून सर्वसाधारण मूल्यमापन करणे आवश्यक आहे. प्रतिवेदन अधिकाऱ्याने गोपनीय अहवाल दिल्यानंतर त्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सदर गोपनीय अहवाल पुनर्विलोकन करणे आवश्यक आहे. पुनर्विलोकन अधिकारी प्रतिवेदन अधिकाऱ्याच्या सर्वसाधारण मूल्यमापनाशी सहमत आहे अगर कसे याबाबत स्पष्ट अभिप्राय नोंदविणे आवश्यक आहे. प्रतिवेदन अधिकाऱ्याच्या मताशी असहमत असल्यास त्याची आवश्यक ती कारणे त्या ठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे गोपनीय अहवाल दरवर्षी नोंदवून ते व्यवस्थितरित्या ठेवणे आवश्यक आहे. प्रशासनाच्या मागणीनुसार वेळीच उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. गोपनीय अहवालामध्ये प्रतिवेदन वा पुनर्विलोकन अधिकाऱ्याने प्रतिकुल शेरे नोंदविल्यास सदर शेरे संबंधित कर्मचाऱ्यांना कळविणे गरजेचे आहे. जेणेकरुन संबंधित कर्मचाऱ्यास त्याचे वर्तन व कामकाजात सुधारणा करण्याची व त्याची बाजू मांडण्याची संधी मिळत असते.

वरील बाबी विचारात घेवून प्रत्येक शासकीय व निमशासकीय संस्थेमध्ये कार्यरत कर्मचाऱ्याचे गोपनीय अहवाल प्रतिवर्षी नोंदविणे व अद्ययावत करणे ही कार्यमूल्यमापनाची एक पध्दत असून, त्या दृष्टीने कार्यवाही करणे अनिवार्य व आवश्यक आहे. त्यामुळे प्रशासकीय स्तरावर एकूणच असणाऱ्या सर्व स्तरावर आणि अंतिमत: सर्व प्रशासकीय यंत्रणेवर सुयोग्य नियंत्रण व स्वयंशिस्त रहाणार आहे. अशा प्रकारच्या यंत्रणेमुळे संस्थेची प्रतिभा व प्रतिमा निश्चित उंचावणार आहे.

## परिचय कार्यक्षम अधिकारी/कर्मचाऱ्याचा

### सौ उल्का कळसकर, मुख्य लेखापाल

सध्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या गतिमान युगामध्ये पुणे महापालिकेच्या मुख्य लेखापालपदी नव्याने नियुक्त झालेल्या श्रीमती उल्का कळसकर यांचेशी संवाद साधताना त्यांच्या आयुष्यातील प्रगतीची वाटचाल खालीलप्रमाणे उलगडा गेली :

पुणे या विद्येच्या माहेरघरी जन्मलेल्या व उच्चशिक्षण घेतलेल्या श्रीमती कळसकर यांनी एम.कॉम.,आय.सी.डब्लु. या पदव्या धारण केल्या आहेत. महापालिकेत रुजू होण्यापूर्वी त्यांनी शार्प ॲण्ड टॅनन या संस्थेमध्ये व्यवस्थापक या पदावर १० वर्षे काम केले आहे. या दरम्यान त्यांना एस.के., फॉरमायका, ग्रिव्हज लि. या खाजगी कंपन्यांच्या लेखापरीक्षणाची मिळालेली संधी ही आयुष्यातील मोठी पूंजी असल्याचे त्या आवर्जून सांगतात.



खाजगी संस्थेमधील कामाचा व्याप, आयुष्यामध्ये काहीतरी करुन दाखविण्याची जिद्द आणि शिक्षणाचा उपयोग समाजासाठी व्हावा या हेतूने श्रीमती कळसकर सन २००२ मध्ये पुणे महापालिकेत प्राप्ती व चाचणीचे अर्थान्विक्षक या पदावर रुजू झाल्या. या पदावर कार्यरत असताना त्यांच्याकडे अंतर्गत अर्थान्विक्षक, अंदाजपत्रक, या महत्वाच्या विभागांची जबाबदारी सोपविण्यात आली होती. ही जबाबदारी पार पाडताना नागरिकांची कामे करण्याची संधी मिळाली.

मनपामध्ये काम करताना त्यांच्या कामाचा अनुभव व तडफ या बाबी विचार त घेवून प्रशासनाने श्रीमती कळसकर यांची मे २००८ मध्ये उपमुख्य लेखापाल पदी तर मे, २००९ मध्ये मुख्य लेखापाल या पदी नियुक्ती करुन रु. ३,००० कोटीच्या अर्थसंकल्पाची यशस्वी हाताळणी करण्याची मनपा प्रशासनाने त्यांना संधी दिली आहे. सदर बाब महापालिकेच्या इतिहासामध्ये विशेष नोंद करण्यासारखी आहे, असे त्या अभिमानाने स्पष्ट करतात. उच्च पदावर एक महिला अधिकारी म्हणून काम करत असताना सर्व सहकाऱ्यांचे उत्तम सहकार्य मिळते. याबद्दल त्या समाधान व्यक्त करतात. तसेच, महापालिकेमध्ये काम करताना सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांनी संस्थेशी एकनिष्ठ राहून कार्य करणे आवश्यक आहे. जेणेकरुन नागरिकांच्या समस्या सत्वर आणि तातडीने सोडविल्या जातील, अशी आशा त्या व्यक्त करतात. आजवरच्या कारकिर्दीत नागरिकांचा अंदाजपत्रकातील सहभाग हे लोकाभिमुख प्रशासनाचे उत्तम उदाहरण असल्याचे त्या मानतात. कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडून दैनंदिन कामकाज यशस्वीरित्या पार पाडताना होणारी कसरत आणि त्यापासून मिळणारे समाधान या बाबी सुखावह असल्याचे त्या सांगतात. महानगरपालिकेमध्ये गेल्या ७ वर्षांत काम करताना सर्वसामान्य नागरिकांचे मुलभूत प्रश्न समजावून घेवून ते सोडवून त्यांना उच्च दर्जाच्या नागरी सुविधा देण्यासाठी सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न करणे आणि प्रशासनाचा कारभार अधिक लोकाभिमुख आणि कार्यक्षम करण्यासाठी प्रशासकीय कार्यपध्दतीत मोठ्या प्रमाणावर मुलभूत बदल करण्याची गरज असल्याचे आग्रही प्रतिपादन करतात.

**संवादक : शिवाजी दौंडकर**
**कामगार कल्याणाधिकारी**

पुणे मनपामध्ये नुकत्याच स्थापन केलेल्या क्षेत्रीय महिला तक्रार निवारण समितीचे अध्यक्ष म्हणून काम करताना या समितीमध्ये बहुसंख्य महिला सदस्य असल्याने महिला कर्मचाऱ्यांनी निसंकोच आपले प्रश्न मांडावेत. समितीपुढे येणारे प्रश्न सर्वंकष विचार करुन तत्परतेने सोडविण्याचा व मुळातच अशा तक्रारी किमान पातळीवर आणण्याचा सातत्याने प्रयत्न राहील, असा आशावाद त्या व्यक्त करतात. श्रीमती कळसकर यांची भविष्यकालीन कारकिर्द यशस्वी व दैदिप्यमान व्हावी, यासाठी कामगार कल्याण निधीतर्फे शुभेच्छा.

### श्री. विनोद क्षीरसागर, कनिष्ठ अभियंता

किल्ले पुरंदरच्या पायथ्याशी असलेल्या भिवडी या गावी जन्मलेले श्री. विनोद क्षीरसागर यांचे सहावीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण मुंबई येथे तर इयत्ता सहावीमध्ये असताना वडिलांचे निधन झाल्यामुळे पुणे मनपाच्या हडपसर येथील शाळेमध्ये इयत्ता सातवीचे शिक्षण झाले. माध्यमिक शिक्षण साधना विद्यालय, हडपसर येथे तर स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदविका शिक्षण कुस्रो वाडिया महाविद्यालयातून त्यांनी पूर्ण केले. कै.नारायणराव जाधव आलेगावकर व टाउनहॉल कमिटी या विश्वस्त संस्थांकडून मिळालेल्या स्कॉलरशिपमुळे त्यांचे सर्व शिक्षण पूर्ण होवू शकले.

वडिलांच्या निधनानंतर कुटुंबकर्ता म्हणून सर्व कुटुंबाची जबाबदारी त्यांचेवर आली. त्यामुळे त्यांना त्यांचा व कुटुंबाचा चरितार्थ चालविणेसाठी नोकरी करणे आवश्यक होते. सुदैवाने मे. कुमार बिल्डर्सकडे साईट इंजिनियर म्हणून त्यांना नोकरी मिळाली. जीवनात शिक्षणाचे महत्व आईने प्रत्येक क्षणी मनावर बिंबविले. परिणामी नोकरी करत असताना अर्धवेळ स्थापत्य अभियांत्रिकी पदवी शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेवून सन १९९३ मध्ये बी.ई. सिव्हिल ही पदवी प्राप्त करताना भारतामध्ये प्रथम येण्याचा बहुमान मिळाल्याचे ते अभिमानाने सांगतात. सन १९९७ साली महापालिकेच्या सेवेत कनिष्ठ अभियंता या पदावर रुजू झालेल्या श्री. क्षीरसागर यांनी पुण्यातील एल.जी.एस.च्या पहिल्याच बॅचमध्ये प्रवेश घेवून, अर्बन लोकल गव्हर्नमेंट (२) या विषयामध्ये संपूर्ण भारतात प्रथम क्रमांकाबरोबर, पंडित रमाबाई वागळे पुरस्कार पटकाविला. तसेच, संगणकविषयक डी.आय.टी., ए.डी.आय.टी.या परीक्षा विशेष प्राविण्याने ते उत्तीर्ण झाले आहेत.



मा.नगर अभियंता यांनी मनपाकडे येणारे बांधकाम परवानगी प्रस्ताव छाननी करण्यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्याची संकल्पना मांडली व त्याची जबाबदारी नगर उप अभियंता श्री. प्रवीण गेडाम, श्री. पावसकर, श्री. क्षिरसागर, श्री. केळकर या चमूवर सोपविली. ती त्यांनी पूर्ण केली व सन २००५ मध्ये पुणे मनपामध्ये प्रथमत: या नवनिर्मित संगणक प्रणालीच्या अंमलबजावणीस सुरुवात झाली. भारतामध्ये ही संगणक प्रणाली वापरणारी पुणे मनपा ही पहिली महापालिका असल्याचे ते अभिमानाने प्रतिपादन करतात. ऑटोडीसीआर प्रणाली बहुविध नियमांची एका वेळी छाननी करुन संमतीपत्र देण्यापर्यंतच्या प्रक्रिया किमान वेळेत करणारी झाली आहे. त्यामुळे संबंधितांना परवानगी अल्पावधीत देणे शक्य झाले. या प्रणालीमुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निर्णय क्षमतेत गती येवून वाढ झाली आहे.

**संवादक:सौ.ज्योती भोसले**

डिसेंबर, २००७ मध्ये लंडन येथे झालेल्या वर्ल्ड लिडरशिप फोरमतर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये आर्किटेक्ट ॲण्ड सिव्हिल इंजिनियरिंग विभागामध्ये पुणे मनपाच्या ॲटोडीसीआर या संगणक प्रणालीला वर्ल्ड लिडरशिप ॲवार्ड प्राप्त झाल्याचे ते अभिमानाने सांगतात. या प्रणालीच्या मुलभूत संशोधन व निर्मितीसाठी त्यांना मा. नितीन करीर, मा. विजय भटकर, मा. प्रशांत वाघमारे, मा. आढारी यांनी बहुमुल्य मार्गदर्शन करुन सक्रीय प्रोत्साहन दिले, तसेच या कामी माझी आई आणि पत्नी यांनी कौटुंबिक जबाबदाऱ्या स्वत: स्विकारुन मला जे वेळोवेळी प्रोत्साहन दिले त्यामुळेच मी सर्वांसह या कार्यास वेळ देवू शकलो आणि पुणे मनपास जागतिक स्तरावरील हा बहुमान प्राप्त झाला आणि अशा संशोधन कार्यामध्ये त्यांना कार्य करण्याचे भाग्य लाभले, असे ते आवर्जुन नमूद करतात. या प्रणालीचे भारतातील बहुतेक महानगरपालिकांनी अनुकरण केल्याचे ते सांगतात. अशा हा लिडरशिप ॲवार्ड कार्यकारी गटातील सक्रीय कार्यकर्त्यास त्याच्या भविष्यकालीन नवीन संशोधनात्मक कार्यास कामगार कल्याण निधीच्या हार्दिक शुभेच्छा.

## माहे एप्रिल, २००९ सेवापूर्ती समारंभ संपन्न

दिनांक ३०/४/२००९ रोजी कॅ. वडके सभागृह येथे माहे एप्रिल, २००९ मध्ये सेवानिवृत्त झालेल्या



अधिकारी/सेवकांसाठी सेवापूर्ती समारंभ आयोजित केला होता. यामध्ये ३६ वयोपरत्वे व ३ ऐच्छिक सेवानिवृत्ती घेतलेल्या अधिकारी/सेवकांचा सत्कार करण्यात आला. या सेवापूर्ती समारंभासाठी प्रमुख पाहुणे मा. श्री. राजेंद्र मुठे, आयातकर प्रमुख, मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) व श्री. अरुण खिलारी, कामगार कल्याणाधिकारी हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुरुवातीस प्रमुख पाहुण्यांचा पुष्पगुच्छ देवून मा. नंदकिशोर जगताप यांनी स्वागत केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यामागची भूमिका विषद केली. सर्वसाधारणपणे वर्ग १ ते ३ हे कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या विभागामार्फत त्यांचा सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यात येतो. तथापि, चतुर्थश्रेणीतील कर्मचारी यापासून वंचित रहातात. सबब, वर्ग १ ते ४ मधून सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व सेवकांचा एकाच व्यासपीठावर सन्मान करुन त्यांच्या सेवानिवृत्तीचे आर्थिक लाभ त्यांना विहित मुदतीत देणे हा उद्देश असल्याचे त्यांनी प्रास्ताविकात नमूद केले. सेवानिवृत्त सेवकांनी प्रदीर्घ सेवा करुन सेवानिवृत्तीच्या वेळी मिळविलेली आर्थिक पूंजी योग्य आणि सुरक्षित ठिकाणी गुंतवावी, सातत्याने कार्यमग्न राहून शरीर आणि मन ताजेतवाने ठेवावे आणि आपले उर्वरित आयुष्य सकारात्मक घालवावे, अशी आशा मा. जगताप यांनी या प्रसंगी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. राजेंद्र मुठे, आयातकर प्रमुख यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये सल्लागार (कामगार) कार्यालयाने सुरु केलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले. विशेष म्हणजे चतुर्थश्रेणीतील कर्मचाऱ्यांना अधिकाऱ्यांसमवेत एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्या प्रदीर्घ सेवेची दखल घेवून त्यांचा सन्मान करणे ही अभिमानास्पद बाब आहे. तसेच, या सेवकांच्या सेवानिवृत्तीच्या आर्थिक रकमा विहित मुदतीत देणेचा सुरु केलेला हा एक चांगला उपक्रम असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, सेवानिवृत्त सेवकांना त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा त्यांनी दिल्या. या कार्यक्रमामध्ये सर्व सेवानिवृत्त सेवकांना स्मृतिचिन्हे, शॉल व गुलाबपुष्प देवून गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कामगार कल्याण अधिकारी श्री. अरुण खिलारी यांनी व आभार प्रदर्शन श्री. जयवंत शिंदे यांनी केले.

## वाचकांना आवाहन

मनपा सेवकांना विविध प्रकारची माहिती देणारे कल्याणवार्ता हे वार्तापत्र प्रसिध्द करण्यात येते. या वार्तापत्रातून आजपर्यंत मनपामधील विविध कार्यक्रमांची माहिती, सेवकांची ओळख, परिचय रुपातून प्रसिध्द करण्यात येत आहे. आपण वेळोवेळी कल्याणवार्तामधून हे सर्व वाचले असेल, वाचत असाल.

कल्याणवार्ताचा अंक आपल्याला कसा वाटला, याबद्दल आपला अभिप्राय, प्रतिक्रिया लिहून आम्हाला पाठवा. निवडक पत्र नावासह प्रसिध्द करण्यात येतील.

या अंकाबद्दल आपल्या सूचना वा विविध प्रकारचे लिखान आम्हाला अपेक्षित आहे. आपण आपल्या सूचना, विविध प्रकारचे लिखान (कथा, कविता, विनोद) लिहून आम्हाला पाठवा.

आपण सुचविलेल्या चांगल्या सूचना विचारात घेवून अंक नाविन्यपूर्ण करता येईल. आपले लिखान अंकातून नावासह प्रसिध्द करण्यात येईल. आपल्या नावापुढे हुद्दा व कार्यालयाचे नाव लिहिण्यास विसरु नका. आपल्या सूचना लिखान स्वतंत्र पानावर पाठवा.

आम्ही आपल्या लिखानाचे स्वागत करण्यास उत्सुक आहोत.

## पुणे मनपामध्ये महाराष्ट्र राज्य स्थापना दिन संपन्न

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा वर्धापनदिन व कामगार दिनानिमित्त पुणे महापालिका कर्मचारी, अधिकारी तसेच पुणे महापालिका कामगार संघटनेच्या वतीने कचरा निर्मूलन जनजागृती प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले.

पुणे महानगरपालिका मुख्य भवन प्रांगणातील महात्मा ज्योतिराव फुले यांचे पुर्णाकृती पुतळ्यास मा. एम.एस.देवणीकर, अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. तसेच आयोजित करण्यात आलेल्या प्रभात फेरीतील जनजागृती रथाचे उद्घाटन करुन रथावरील श्री. शिवाजी महाराज यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

या प्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या ओला सुका कचरा निर्मूलन तसेच जनजागृतीपर कार्यक्रमासंदर्भात पुणे मनपा कामगार युनियनच्या सरचिटणीस श्रीमती मुक्ता मनोहर यांनी माहिती दिली. तसेच, मा. देवणीकर यांनी कचरा निर्मूलनाच्या संदर्भात प्रशासनाचे वतीने करण्यात येत असलेल्या विविध कामासंदर्भात तसेच उपाय योजना संदर्भात माहिती दिली व मार्गदर्शन केले.

प्रभात फेरीत सहभागी झालेल्या मा. कुमार सप्तर्षी, मंगेश तेंडुलकर, सिनेदिग्दर्शक अतुल पेठे, डॉ. सतीश देसाई, मा. श्रीमती शामला देसाई, विविध स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी, मोलकरीण



संघटना तसेच, अन्य पदाधिकाऱ्यांचा या अभियानात सहभागी झाल्याबद्दल मा. देवणीकर यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

जनजागृती फेरीत सहभागी झालेल्या मान्यवरांकडून नागरिकांना माहिती देताना ओला व सुका कचरा विभाजन पध्दती, त्याचे फायदे, बायोगॅस प्रकल्प, गांडुळखत प्रकल्प, प्लॅस्टिक निर्मूलन याबाबत माहिती देण्यात आली व नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.

मनपा कर्मचाऱ्यांचे वतीने पथनाट्याद्वारे ठिकठिकाणी प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. प्रभात फेरीत ठिकठिकाणी नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. पुणे महापालिका मुख्य भवनापासून सकाळी ७.०० वाजता प्रभात फेरीला सुरुवात झाली. पुणे महापालिका ते महात्मा फुले स्मारक समता भूमी पर्यंत नियोजन करण्यात आले होते.

## वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयांतर्गत ओला व सुका कचऱ्याचे वर्गिकरण जनजागृती अभियान प्रचार फेरीचे आयोजन

वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयांतर्गत वॉर्ड क्र. १०६ कोथरुड गावठाण या वॉर्डामध्ये संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानांतर्गत ओला व सुका कचऱ्याचे वर्गिकरण जनजागृती



अभियान प्रचार फेरी काढण्यात आली. या वेळी मा.चंद्रकांत मोकाटे, उपमहापौर यांनी नागरिकांना ओला व सुका कचऱ्याचे वर्गिकरण करुन प्रत्येक सोसायटीने आपल्या मोकळ्या जागेत पिट्स तयार करुन ओला कचरा गांडूळखत प्रकल्पाद्वारे जिरवून उत्तम प्रकारे खत तयार करुन आपल्या बागेला वापरा व सुका कचरा रॅक पिकर्सकडे द्यावा. तसेच ओला कचरा नागरिकांनी वेगळा करुन दिल्यास तो ओला कचरा शेतकऱ्यांना मोफत देण्यात यावा, असे आवाहन केले.

श्री. शौनक अभिषेकी, शास्त्रीय संगित गायक यांनी कचऱ्याची समस्या संपूर्ण भारत देशामध्ये असून भयावह परिस्थिती निर्माण झालेली आहे. याकडे नागरिकांनी दुर्लक्ष करुन चालणार नाही. नागरिकांनी स्वत: पुढाकार घेवून ओला कचरा जिरविणेबाबत मनपाला सहकार्य करा.अशा प्रकारच्या अभियानाला आम्हा सर्व कलाकारांचा पाठिंबा आहे, असे मनोगत व्यक्त केले.

ओला व सुका कचरा वेगळा करण्यासाठी नागरिकांना मा.चंद्रकांत मोकाटे, उप महापौर, श्रीमती शर्वरी जेमिनीस, सिने अभिनेत्री, श्रीमती मीना फातरपेकर, शास्त्रीय संगित गायिका, श्री. सुनिल महाजन, पुणे संवादचे अध्यक्ष, श्रीमती निकिता मोघे, नृत्य निर्देशक, मा. डॉ. आर.आर.परदेशी, आरोग्य प्रमुख, मा. सुनिल गायकवाड, क्षेत्रीय अधिकारी, डॉ. संतोष मुळे, क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी, श्री. दिपक ढेलवान, आरोग्य निरीक्षक, मा. बाळासाहेब टेमकर, शिवसेना कोथरुड विभाग प्रमुख यांच्या हस्ते प्लास्टिकच्या बकेटचे वाटप करण्यात आले.

सदर कार्यक्रमात श्री. मंगेश तेंडुलकर, ज्येष्ठ व्यंगचित्रकार, कु. भार्गवी चिरमुले, एकापेक्षा एक महाविजेती, मा. विजय दहिभाते, उप आयुक्त, मा. सुरेश जगताप, उप आयुक्त, घन कचरा व्यवस्थापन, मा. श्रीमती मुक्ता मनोहर, सरचिटणीस, पुणे मनपा कामगार युनियन, श्री. मधुकर कारकुड, विभागीय आरोग्य निरीक्षक, श्री. राम सोनवणे, श्री. सुहास पांढरे, श्री. शिवाजी गाढवे, सौ. सुनिता वायकर, श्री. योगेश मोकाटे उपस्थित होते. प्रचार फेरीमध्ये श्रमिक कला पथकाचे श्री. महादेव जाधव, श्री. चंद्रकांत जाधव, नागनाथ गायकवाड, श्रीमती सुमन आसटूळ, श्री. नामदेव लोढे व त्यांच्या सहकाऱ्यांनी गायनाच्या माध्यमातून ओला व सुका कचरा वर्गिकरणसंदर्भात नागरिकांचे प्रबोधन केले. प्रचार फेरीमध्ये मोठ्या प्रमाणात नागरिक सहभागी होते.

सदर प्रचार फेरी शिवाजी पुतळ्यापासून निघून कोथरुड गावठाण, मंत्रीपार्क सोसायटी, तेजस नगरमध्ये फिरुन प्रचार फेरीची सांगता शिवाजी पुतळा, कोथरुड येथे करण्यात आली.

प्रचार फेरीचे आयोजन श्री. दिपक ढेलवान, श्री. आण्णा ढावरे, श्री. वैजीनाथ गायकवाड यांनी केले.

## पुणे मनपामध्ये जागतिक परिचारिका दिनाचे आयोजन

पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरु रुग्णालय येथे दि. १२/५/०९ रोजी जागतिक परिचारिका दिन मोठ्या उत्साहात साजरा करणेत आला. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व परिचारिकांच्या व्यावसायिक प्रतिज्ञेने करणेत आली.



त्यानंतर मा. आरोग्य प्रमुख यांनी परिचारिकांना प्रभावी मार्गदर्शन केले. श्रीमती मुक्ता मनोहर यांनीही मार्गदर्शनपर भाषण केले. त्यानंतर डॉ. वैशाली जाधव यांचे हस्ते या वर्षी सेवानिवृत्त परिचारिकांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सत्कार करणेत आला.

कार्यक्रमाच्या निमित्ताने परिचारिकांची रुग्णांचे आजार, उपचार तसेच आरोग्यविषयक राष्ट्रीय कार्यक्रम, सामान्य ज्ञान, इत्यादी विषयातील प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेचे नियोजन व परीक्षण कमला नेहरु रुग्णालयाचे मानसिक रोग तज्ञ डॉ. देवेंद्र शिरोळे व त्यांचे सहकारी डॉ. नेने व डॉ. पळसंगकर यांनी केले. दैनंदिन कामात बदल म्हणून कार्यालयीन वेळेनंतर सेवकांच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या. सदर स्पर्धांमध्ये परिचारिकांनी मोठ्या संख्येने भाग घेतला.

दैनंदिन जीवनात येणारे तणाव व्यवस्थापन या विषयावर सोपी व व्यावहारिक उदाहरणे देत, सर्वांशी सुसंवाद साधत प्रजापिता ब्रह्मकुमारी संस्थेच्या सरिता बहेन राठी यांनी व्याख्यान दिले, जीवनातील तणाव कमी करुन रुग्णांची सेवा अधिक उत्तम रितीने कशी करावी, हे सांगितले. अशी व्याख्यानमाला पुन्हा आयोजित करण्याची मागणी उपस्थितांनी केली. यानंतर कमला नेहरु रुग्णालयाच्या मेट्रन सौ. शकुन बगाडे यांनी सर्वांचे आभार मानले. त्यानंतर राष्ट्रगीताचे समूहगान झाले व स्नेहभोजनाचा कार्यक्रम झाला.

कार्यक्रमास डॉ.आर.आर.परदेशी, आरोग्य प्रमुख, डॉ. ध.दि.चांदककर, उप आरोग्य प्रमुख, डॉ. वि.मा.सातारकर, सहाय्यक आरोग्य प्रमुख, डॉ. वैशाली जाधव, सहाय्यक आरोग्य प्रमुख, श्रीमती मुक्ता मनोहर, सरचिटणीस, पुणे मनपा कामगार युनियन, डॉ. सुनिल तोरे, प्रशासकीय अधिकारी, कमला नेहरु रुग्णालय, डॉ. शुभांगी जाधव, असिस्टंट मेडिकल सुपरिटेंडेंट तसेच अनेक वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. या सर्व कार्यक्रमास मनपाच्या रुग्णालयातील बहुसंख्य परिचारिका तसेच डॉक्टर्स व इतर सेवक असे सुमारे ३५० लोक उपस्थित होते.

## कै. सदु शिंदे साखळी क्रिकेट स्पर्धेमध्ये पुणे महानगरपालिका क्रिकेट संघाने प्रेसिडेंट चषक पटकावला

दि. १६/५/०९ रोजी कै. सदु शिंदे साखळी क्रिकेट स्पर्धेतील प्रेसिडेंट चषक स्पर्धेचा अंतिम सामना पुणे मनपा क्रिकेट संघाविरुध्द सिध्दीविनायक क्रिकेट संघ यांचेमध्ये एनसीएल क्रिकेट ग्राउंड येथे खेळविण्यात आला. सदर अंतिम सामन्यामध्ये पुणे महानगरपालिका क्रिकेट संघाने धडाकेबाज खेळ करीत अंतिम सामना ३१ धावांनी जिंकून प्रेसिडेंट चषक सलग दुसऱ्या वर्षी पटकावला. पुणे मनपा संघाने प्रथम फलंदाजी करताना ४० षटकात ६६ धावांच्या सलामीने ९ बाद २४४ धावा केल्या. तर या धावांचा पाठलाग करताना सिध्दी विनायक क्रिकेट संघाचा डाव ३५.१ षटकात २१३ धावांमध्ये आटोपला.

या स्पर्धेसाठी संघातील सर्व खेळाडूंनी भरपुर सराव केला होता. यापूर्वीही पुणे महापालिकेच्या क्रिकेट संघाने आंतर कचेरी क्रिकेट, आंतरमहापालिका स्पर्धा, तसेच अनेक निमंत्रित क्रिकेट स्पर्धांमधून अजिंक्यपद मिळविले आहे. त्याचबरोबर चमूतील सर्व खेळाडुंना मनपा प्रशासनातर्फे क्रिकेट ड्रेस, ट्रॅकसुट, शूज व कॅप असा परिपूर्ण पोशाख सल्लागार (कामगार) कार्यालयात, मा. कोंढरे, उप आयुक्त (ज) व मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले होते. सरावासाठी खेळाचे मैदान आणि मनपाचे प्रतिनिधी म्हणून सदर खेळाडूंना ड्रेस, शूज आणि ट्रॅक सुट देण्यामध्ये मा. माने, मुख्य उद्यान अधिक्षक आणि मा. सुभाष पुरी, व्यवस्थापक, पं.नेहरु स्टेडियम यांनी बहुमुल्य सहकार्य केले किंबहुना त्यांच्या सक्रीय पुढाकारानेच हे शक्य होवू शकले. विजयी संघाचे खास हार्दिक अभिनंदन.

**कल्याणवार्ता**
मे, २००९
❖ प्रकाशक तथा अध्यक्ष ❖
कामगार कल्याण निधी
मा. महेश झगडे
आयुक्त, पुणे महापालिका
❖ संपादक ❖
मा. नंदकिशोर जगताप
सल्लागार (कामगार)
❖ कार्यकारी संपादक ❖
शिवाजी दौंडकर
कामगार कल्याण अधिकारी
❖ सहाय्यक ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ मुद्रक ❖
जयंत पवार
व्यवस्थापक,
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ प्रकाशन स्थळ ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.
❖ संपर्क ❖
सल्लागार (कामगार) कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५५/१२५२/१२५३
ईमेल आयडी
nandkumar.jagtap@punecorporation.org

## मौलाना अब्दुल कलाम आझाद स्मारक येथे कॅन्सर चर्चासत्राचे आयोजन

दि.५/५/०९ रोजी जागतिक तंबाखु विरोधी दिनानिमित्त पुणे मनपा उपायुक्त क्र. २ व कॅन्सर पेशन्टस् एड असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे मनपातील चतुर्थश्रेणी सेवकांसाठी यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला. मा. मोळक यांनी आपल्या मनोगतामध्ये भविष्यात पुणे मनपा कामगारांसाठी कॅन्सर तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात येईल, असे नमूद केले.




तंबाखु सोडा कॅन्सरमुक्त व्हा शिबीराचे मौलाना अब्दुल कलाम आझाद स्मारक येथे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात कॅन्सर एड असोसिएशन, पुणे चे डॉ. चेतन देशमुख, वीणा गायकवाड, सुफल गायकवाड यांचा सहभाग होता.

डॉ. चेतन देशमुख यांनी कॅन्सर कसा टाळावा, तंबाखुचे दुष्परिणाम व स्त्रियांमधील कॅन्सर याविषयी उपस्थितांना बहुमोल मार्गदर्शन केले. कु. वीणा गायकवाड यांनी कॅन्सरविषयी माहिती दिली. कार्यक्रम मा. ज्ञानेश्वर मोळक, उप आयुक्त (वि.का.क्र.२)

या प्रसंगी मा. मुकुंद भोसले, क्षेत्रीय अधिकारी, मा. वसंत पाटील, क्षेत्रीय अधिकारी, श्री. रविंद्र कांबळे, डॉ. मिलिंद खेडकर, क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी, डॉ. सुनिल आंधळे, क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी तसेच विभागीय आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक, मोकादम व सुमारे १००० चतुर्थश्रेणी कामगार उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मिलिंद खेडकर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. मुकुंद भोसले, क्षेत्रीय अधिकारी यांनी केले.

## राजयोगिनी अहिल्याबाई होळकर महानाट्यास पुणे मनपाचा लक्षणीय सहभाग

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, इतिहासातील प्रखर महिला व्यक्तिमत्वाने महिलांच्या आणि बहुजन घेतला होता. या महानाट्याचा प्रयोग पहाण्यासाठी पुणे मनपाच्या स्थायी समितीचे अध्यक्ष मा. निलेश निकम, मा.



समाजाच्या उध्दाराचे कार्य प्रतिकुल परिस्थितीत करुन समाजाला एक वेगळी दिशा ज्यांनी समाजकारणातून दिली. मीरा फिल्मसतर्फे निर्मित केलेल्या राजयोगिनी अहिल्याबाई होळकर या महानाट्यास रु. ३ लाखाचे अनुदान देवून या महानाट्याचे सक्रीय सहप्रायोजकत्व पुणे महानगरपालिकेने स्विकारले आहे.

या महानाट्यामध्ये ॲड. मंजुषा इधाटे, म्युनिसिपल प्रॉसिक्युटर यांनी स्वत:च्या मुलासह स्त्री जागृती व सामाजिक कार्याच्या उद्देशाने या महानाट्यामध्ये अभिनयाबरोबरच संयोजक म्हणून काम पाहिले. त्याचप्रमाणे श्री. मंगलदास माने, आदर्श गायकवाड, सदाशिव जाधव, वंदना उकरडे, रिबेका आढाव या पुणे महानगरपालिकेतील सेवक कलावंतांनी प्रथमपासून या महानाट्यामध्ये सहभाग

दिपक मानकर, मा. आबा बागुल, मा. विरेंद्र किराड, मा. कमल व्यवहारे, मा. मेधा कुलकर्णी यांनी महानाट्यास उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. तसेच, पुणे महानगरपालिकेचे अधिकारी मा.नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार), तसेच उप आयुक्त मा. ज्ञानेश्वर मोळक, मा. प्रवीण आष्टेकर, मा. लक्ष्मण डामसे, मा. सौ कळसकर, मुख्य लेखापाल, मा. सौ. नलावडे, उप मुख्य लेखापाल, मा. पोळ, नगर अभियंता, सौ. उंबरीकर, संचालक, राजीव गांधी प्राणी संग्रहालय, डॉ. अंजली साबने, डॉ. एस.टी.परदेशी, श्रीमती केदारी, यांचेसह अनेक मनपा अधिकारी/सेवकांनी या ऐतिहासिक महानाट्यास हजेरी लावली. या सर्व मान्यवरांचा मिरा फिल्मतर्फे मिलिंद दास्ताने यांनी सत्कार केला.